ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख २५ ऑगस्ट, १९५४ | अंक ३३

## विविध माहिती

**लॉइडस बँकेची प्रगति**—लंडनमधील लॉइडस बँक आणि नॅशनल प्राव्हिन्शिअल बँक ह्यांनीं जानेवारी, १९५५ पासून अंमलांत आणण्याचा एक करार केला आहे ह्या कराराप्रमाणें लॉइडस बँक लॉइडस बँकेंतील नॅशनल प्रॉव्हिन्शिअल बँकेचे भाग आणि नॅशनल प्रॉव्हिन्शिअल फॉरिन बँकेचे भाग विकत घेणार आहे. ह्या बदलामुळें नॅशनल प्रॉव्हिन्शिअल फॉरिन बँक ही लॉइडस बँकेची उपबँक होणार आहे आणि तिचें नांवहि बदलण्यांत येणार आहे.

**तंजावर येथें साखरेचा कारखाना**—तंजावर येथें साखरेचा कारखाना काढण्यांत येणार आहे, असें समजतें. कारखान्यांत दररोज १,००० टन ऊंस गाळूं शकणारी यंत्रसामुग्री बसविण्यांत येणार आहे. कारखान्याला उसाचा पुरवठा व्हावा म्हणून ४,००० एकर जमिनींत उसाची लागवड करावी लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. मद्रास राज्याला दरवर्षी सुमारें ९०,००० टन साखर लागते. वार्षिक उत्पादन मात्र ४३,००० टनच आहे.

**उत्तर कॅनरा जिल्ह्यांतील भातशेती**—उत्तर कॅनरा जिल्ह्यांत चालू हंगामांत ४,००० एकर जमिनींत जपानी पद्धतीनें भातशेती करण्याचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें होतें. त्यांपैकी १,००० एकर जमिनींत नव्या पद्धतीनें लागवड करण्यांत आली आहे. चालू सालीं नव्या पद्धतीचीं प्रात्यक्षिक दाखविणारीं ५०० केंद्रें उघडण्यांत येणार आहेत.

**पुरामुळें झालेलें नुकसान**—बंगालच्या वायव्य भागांत नद्यांना पूर आल्यामुळें खाजगी व सार्वजनिक मालमत्तेचें मिळून सुमारें २ कोटी रुपयांचें नुकसान झालें असल्याचें अधिकृतरीत्या जाहीर करण्यांत आलें आहे. नुकसानीच्या अंदाजांत रेल्वेच्या मालमत्तेची नासधूस लक्षांत घेतलेली नाहीं. प. बंगाल सरकारनें मध्यवर्ती सरकारकडे २५ लाख रुपयांची मदत मागितली आहे.

**पोस्टाच्या तिकिटांचें प्रदर्शन**—येत्या ऑक्टोबर महिन्यांत दिल्ली येथें पोस्टाच्या तिकिटांचें आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनांत ६२ देश भाग घेणार आहेत. युरोपांतील व आशियांतील बऱ्याच देशांनीं प्रदर्शनांत भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केली आहे. इंडो-चीनमधील लओस आणि व्हिएट-नाम हे देशहि सामील होणार आहेत.

**अमेरिकन चित्रपटाला परवाना नाकारला**—अमेरिकेंतील रिपब्लिक पिक्चर्स कॉर्पोरेशन ह्या कंपनीनें 'डॉन डेअर डेव्हिल रायझेस अगेन' ह्या नांवाचा एक चित्रपट काढला आहे. हा चित्रपट आणि आगाऊ दाखविण्याचा लघुपट ह्यांना भारतीय सरकारनें हिंदुस्थानांत दाखविण्यास अयोग्य म्हणून ठरविलें आहे.

**सरदार पटेल ह्यांचें स्मारक**—हैद्राबाद शहर काँग्रेस कमिटीनें सरदार वल्लभभाई पटेल ह्यांचा पुतळा उभारण्याचें ठरविलें आहे. भारतामधील संस्थानांना भारतांत विलीन करण्याचें कार्य मुख्यतः त्यांनींच केलें असल्यामुळें हें स्मारक उभारण्यांत येणार आहे. स्मारकासाठीं पैसा गोळा करण्याचें कार्य १५ जणांच्या कमिटीकडे सोंपविण्यांत आलें आहे. ५०,००० रुपये जमविण्याचा संकल्प सोडण्यांत आला आहे.

**जपानमधील स्त्री-कामगार**—जपान सरकारच्या मजूर खात्यानें केलेल्या अंदाजाप्रमाणें, जपानमध्यें गेल्या वर्षी ४०,८०,००० स्त्री-कामगार होत्या. पुरुष-कामगारांची संख्या १,०७,२०,००० इतकी होती. ३७ टक्के जपानी स्त्रिया उद्योगधंद्यांतून कामें करीत होत्या आणि २३·४ टक्के स्त्रिया शिक्षक, डॉक्टर्स, परिचारिका, इत्यादि प्रकारचीं कामें करीत होत्या.

**गांवकऱ्यांचें श्रमदान**—भोपाळ येथें पंचायतींचा कारभार चालविण्याचें शिक्षण देणारें केंद्र खोलण्यांत आलें होतें. ह्या केंद्रांत शिकणाऱ्या गांवकऱ्यांनीं सांची येथें एक इस्पितळ बांधलें आहे. गांवकऱ्यांनीं स्वतः होऊन श्रमदान करण्याची तयारी दाखविली. इस्पितळांत दहा रुग्णांची सोय करण्यांत आली आहे.

**राष्ट्रीय-विकास कार्याला मदत**—हैद्राबाद म्युनिसिपल कॉर्पोरेशननें राष्ट्रीय-विकास योजनेच्या कर्जाचे २०,००० रुपये किंमतीचे रोखे विकत घेण्याचें ठरविलें आहे. हैद्राबाद शहराच्या विकासाची एक योजनाहि कॉर्पोरेशनतर्फे तयार करण्यांत येत असून तिचा अंतर्भाव दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत यावा अशी विनंति करण्यांत येणार आहे.

**चीनमधील विकास योजनांचा धडा**—भारतीय सरकारच्या वॉटर अँड पॉवर कमिशनचे डायरेक्टर डॉ. राव ह्यांनीं पाटणा येथें भाषण करतांना असें सांगितलें कीं, कोसी नदीच्या प्रवाहाला निर्बंध घालण्याच्या कामीं चीनमध्यें ह्यासंबंधीं करण्यांत आलेल्या प्रयोगांचा उपयोग करतां येण्यासारखा आहे. डॉ. राव हे नुकतेंच चीनमधील नदी-खोरे योजनांची पहाणी करून आले आहेत.

**मोफत आरोग्य केंद्र**—नाशिक विडी-कामगार-मित्रमंडळ ह्या संस्थेनें आरोग्यासंबंधीं मोफत सल्लामसलत व मदत करणारें एक केंद्र काढलें आहे. केंद्राचें उद्घाटन नाशिक म्युनिपालिटीचे अध्यक्ष श्री. वाघ ह्यांनीं केलें. केंद्राच्या कामांत सहकार्य करण्याचें आश्वासन गांवांतील कांहीं डॉक्टर-मंडळींकडून मिळालें आहे.

**हैद्राबाद राज्यांतील धरण**—हैद्राबाद राज्यांत बेंदसुरा येथें एक मध्यम प्रतीचें धरण बांधण्यांत आलें आहे. ह्या धरणामुळें ९,३०० एकर जमिनीस पाणीपुरवठा होईल. धरण बांधण्यास ५८ लाख रुपये खर्च आला.

## महाराष्ट्र रिजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें

### को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा निकाल

जून, १९५४ मध्यें पुणें येथें झालेल्या को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षेचा निर्णय जाहीर झाला असून त्यांत पुढील विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कंसांतील आंकडे विद्यार्थ्यांचे परीक्षेचे नंबरचे आहेत:—

**पहिला वर्ग**

ए. के. देशपांडे (७)

**दुसरा वर्ग**

बी. बी. बुधकर (३), जी. व्ही. चिथडे (४), एम. जे. देशमुख (६), के. एस. जाधव (१२), के. ए. कामथे (१८), एच. एम. कानडे (१९), एम. डी. खांबेटे (२१), बी. जे. खांडरे (२२), जी. बी. कुरणे (२९), जी. एम. मुळे (३३), डी. जी. नाशिककर (३४), बी. झेड. ओगले (३५), एस. व्ही. पराडकर (३६), पी. झेड. पाटील (३७), एस. आर. पाटील (३८), व्ही. आर. पाटील (३९), बी. पी. पवार (४०), एस. आर. पवार (४१), व्ही. आर. प्रभुणे (४३), डी. आर. पुरंदरे (४५), ए. पी. साळुंखे (४८), एन. वाय. श्रींगोंदेकर (५२), ए. टी. सोनार (५३). एस. बी. तट् (५४), आर. जी. ठोंगे (५५), एम. आर. तोडकरी (५७), आय. के. भगत (६०), व्ही. टी. उरुणकर (७०), एन. जी. म्हात्रे (७१), डी. टी. पाटील (७७), आर. डी. पाटील (७८),

**तिसरा वर्ग**

के. एल. बागवान (१), बी. वाय. देशमुख (५), पी. एस. धायगुडे (११), जी. डी. जोशी (१४), एस. जी. जोशी (१५), एस. व्ही. खळदकर (२०), एस. डी. खारकर (२३), डी. पी. कुलकर्णी (२७), एम. डी. कुलकर्णी (२८), बी. एन. पोंक्षे (४२), एल. एम. राजापुरे (४६), जे. डी. रेळेकर (४७), के. आर. साळुंखे (४९), व्ही. व्ही. संभूस (५०), एम. बी. थोरात (५६), एम. एच. परदेशी (६१), पी. के. धुमाळ (६५), एस. के. कुलकर्णी (६६), डी. बी. गुमास्ते (६८), व्ही. जी. पळसुळे (७२), ए. यू. कोतवाल (७५), ए. एस. झोरे (७३).

मा. वि. मदाने
सुपरिन्टेन्डेन्ट.

---

### दि पूना मर्चंट्स को. बँक लि., पुणें

वर्षअखेरीस ७८२ सभासद पटावर आहेत. खपलेल्या भांडवलांत २,४४० रु. ची वाढ व १३,६२० रु. ची घट होऊन वर्षअखेर तें १,६२,६०० रु. पर्यंत आलें आहे. गेल्या वर्षीचे मानानें अहवालाचे वर्षी ठेवींत थोडी वाढच होऊन त्यांची रक्कम ६,६६,४९१ रु. झाली. थकबाकीचें शेकडा प्रमाण २७ टक्क्यांवरून १९ टक्क्यांपावेतों खाली आलें आहे. खर्चाचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण २·१६% आहे. अहवालाचे सालीं ६,४४१ रु. नफा झाला व ३% डिव्हिडंड देण्यांत येईल. ( चेअरमन:—ग. म. नलावडे. एजंट:—भ. ग. सावणे )

---

### फिनॅन्स कॉर्पोरेशन्सच्या शेअर्सचा दर्जा वाढला

शेड्यूल्ड बँकांना रिझर्व्ह बँक कायद्याच्या १७ (४) (अ) कलमाखाली कर्जे देण्याच्या बाबतींत तारण म्हणून विचार करतांना, मध्यवर्ती व राज्य फिनॅन्स कॉर्पोरेशन्सचे शेअर्स व बाँडस ह्यांना सरकारी रोख्यांचे समान मानलें जाईल, असें रिझर्व्ह बँकेनें ठरविलें आहे.


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५३ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,९९,००० |
| ठेवी | रु. | ७१,६८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८६,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | १-०-० |
| चालू डिपॉझिट | „ | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., *चेअरमन*



दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखा:—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्लें, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिक्कोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,१७,००० |
| ठेवी | रु. | ८२,२०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,०८,००,००० |


बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींमध्यें अद्ययावत् पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५२ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. २५ ऑगस्ट, १९५४


संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद् वामन काळे


## विकास योजना कर्जाचें यश

अर्थमंत्री, श्री. चिंतामणराव देशमुख, ह्यांनीं नभोवाणीवर भाषण करून भारत सरकारच्या राष्ट्रीय विकास योजना कर्जास प्रत्येक नागरिकानें हातभार लावावा, अशी त्यांची योजना आहे, असें सांगितलें आणि सर्वांनीं कर्जरोखे विकत घ्यावे, असें त्यांनीं आग्रहानें प्रतिपादन केलें. विकासासाठीं लागणारा पैसा लोकांनींच उभा केला पाहिजे, ह्या गोष्टीवर त्यांनीं भर दिला. पैशाच्या उपभोगावर लोकांनीं आपण होऊन नियंत्रण घातलें पाहिजे; नाहींतर तें नियंत्रण त्यांचेवर लादावें लागेल, हें उघड आहे. पंचवार्षिक योजनेवर एकूण सुमारें २,२५० कोटी रु. खर्च व्हावयाचे आहेत. तथापि, अंतर्गत उपलब्ध पैशाच्या पुरवठ्याच्या मानानें ही रक्कम १,००० कोटी रुपयांनीं जास्त आहे. कांहीं रक्कम करांचे मार्गानें उभी करतां येईल, कांहीं नोटा छापून उभारतां येईल, पण ह्या निर्माण केलेल्या चलनाची मर्यादा सुरक्षित राखण्याचें काम लोकांच्या खुषीच्या बचतींच्या द्वारांच योग्य तऱ्हेनें साध्य होईल, हें उघड आहे.

सरकारनें प्रस्तुत कर्ज व सरकारची इतर वेळेची नेहेमींची कर्जउभारणी, ह्यांत मूलभूत फरक आहे. नवभारताची उभारणी करण्याचे प्रयत्नांत सामील होण्यासाठीं प्रस्तुत कर्जयोजना ही एक संधि आहे. तथापि, लोकांनीं ह्या संबंधांत अधिक उत्साह व कर्तव्यनिष्ठा दाखविणें जरूरीचें आहे. सुमारें चार महिने हें कर्ज जनतेपुढें आहे; १५ सप्टेंबरअखेर त्याची विक्री बंद करण्याचा सरकारचा विचार आहे. त्यापूर्वी, लोकांनीं शक्य तेवढे कर्जरोखे विकत घ्यावेत, अशी विनंति अर्थमंत्र्यांनीं केली आहे. लोकांच्या कडून पुरेसे पैसे मिळाले नाहींत, तरी खर्च चालूच रहाणार असल्यानें तुटीच्या अर्थव्यवस्थेचा अधिकाधिक आधार सरकारला घ्यावा लागेल आणि ही गोष्ट तितकीशी हितावह नाहीं. देशाची आर्थिक पत टिकवावयाची असेल, तर तुटीच्या अर्थव्यवस्थेचा अवलंब जेवढा कमी करावा लागेल, तेवढें चांगलें.

१९ एप्रिल, १९५४ पासून म्हणजे कर्ज जाहीर झाल्यापासून जुलै, १९५४ अखेर एकूण १२५ कोटी रुपयांचे कर्जरोखे खपले आहेत. कर्जाच्या पहिल्या दोन आठवड्यांत ४५·५ कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री झाली, मे महिन्यांत ३५·५ कोटी रु. मिळाले, जूनमध्यें २४·५५ कोटी रु. जमा झाले व जुलैमध्यें २० कोटी रुपये कर्जरूपानें आले. ऑगस्टमध्यें कर्जरोख्यांची विक्री बरीच कमी झालेली दिसते. अर्थमंत्र्यांनीं अंदाजपत्रकाचे वेळीं, गेल्या फेब्रुवारीमध्यें भाषण केलें, त्यावेळीं ७५ कोटी रुपयांच्या कर्जउभारणीची अपेक्षा व्यक्त केली होती आणि २५० कोटी रुपयांसाठीं ट्रेझरी बिलांचा अवलंब करावा लागेल असें सांगितलें होतें. म्हणजे, प्रत्यक्ष कर्जउभारणीची रक्कम असमाधानकारक नाहीं, हें खरें आहे. तथापि, ज्या मानानें कर्ज-रोखे अधिक खपतील, त्यामानानें ट्रेझरी बिलांवरील अपरिहार्य अवलंबन कमी होईल, हें उघड आहे. राज्य सरकारांना मध्यवर्ती सरकाराकडून २१४ कोटी रु. कर्जाच्या रूपानें मिळणार आहेत व तीं सरकारें स्वतःचीं कर्जें उभारणार नाहींत. म्हणूनच, त्यांनीं मध्यवर्ती सरकारची कर्जउभारणी यशस्वी होण्यासाठीं अधिक नेटानें प्रयत्न केले पाहिजेत. ह्या एकट्या कर्जउभारणीनें आपल्या आर्थिक विकासाची गरज भागणार नसून ह्यापुढें अधिकाधिक बचतींची व त्यागाची आवश्यकता रहाणार आहे. ह्या दृष्टीनें, राष्ट्रीय विकास योजना कर्जाच्या यशास विशेष महत्त्व आहे.

## बिहारमधील शैक्षणिक प्रयोग

बिहार राज्य सरकारनें माध्यमिक शिक्षणाच्या पद्धतींत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीनें एक नवा प्रयोग करण्याचें ठरविलें आहे. माध्यमिक शाळांत देण्यांत येणारें शिक्षण उद्योग-शाळांच्या द्वारां देण्याची योजना आखण्यांत आली आहे. प्रयोग म्हणून ही योजना सुरुवातीला ३० शाळांतून अंमलांत यावयाची आहे. नव्या पद्धतीनें शिक्षण देऊं शकणारे शिक्षकच प्रथम शिकवून तयार करणें जरूर असल्यानें ६० माध्यमिक शिक्षकांना नवीन पद्धतीचें शिक्षण देण्यांत येणार आहे. चार अमेरिकन शिक्षणतज्ज्ञांच्या देखरेखीखालीं त्यांना नव्या पद्धतीचें शिक्षण देण्यांत येईल. बिहार, प. बंगाल, आसाम आणि ओरिसा ह्या राज्यांतून शिक्षकांची निवड करण्यांत येणार आहे. बिहार राज्यांतून ३० शिक्षक निवडण्यांत येणार असून बाकीचे इतर राज्यांतील असतील. माध्यमिक शाळांतून देण्यांत येणाऱ्या शिक्षणक्रमांत विविधता असावी, असें मत शिक्षण विषयांतील तज्ज्ञांनीं अनेकदां व्यक्त केलेलें आहे. सध्यांच्या एकांगी शिक्षण-पद्धतींत विद्यार्थ्यांच्या विविध प्रकारच्या कलांना वाव मिळत नाहीं आणि तींत देशाच्या सध्यांच्या गरजांचाहि विचार केलेला नाहीं, हें मत आतां जवळजवळ सर्वमान्य झालेलें आहे. भारताची औद्योगिक प्रगति घडवून आणण्याचे प्रयत्न होत असतां शिक्षणाची पुनर्घटना होणें अवश्यच आहे. भारतीय सरकारचें शिक्षण-खातें ह्या परिस्थितीचा गंभीरपणें विचार करीत आहे. विविध प्रकारचें शिक्षण देणाऱ्या नव्या शाळा स्थापन करण्याचा शिक्षण-खात्याचा उद्देश जाहीरच आहे. गेल्या जूनमध्यें अलमोरा येथें एक शिक्षणविषयक छावणी भरविण्यांत आली होती. तेथील चर्चेंत, शाळांना जोडून व्यवसाय-केंद्रें उभारण्याची सूचना करण्यांत आली होती.

## परदेशी पाहुण्यांमुळें ग्रेटब्रिटनचा फायदा

ग्रेटब्रिटनमध्यें चालू वर्षी ८,५०,००० विदेशी प्रवासी अपेक्षित आहेत. गेल्या वर्षीपेक्षा ही संख्या ३०,००० नें जास्त आहे. गेल्या सालीं परदेशी पाहुण्यांमुळें ग्रेट ब्रिटनचा १२,६०,००,००० पौंडांचा व्यवहार झाला होता; चालू वर्षी हा आंकडा १३,००,००,००० पौंडांवर जाईल अशी अपेक्षा आहे. ह्या आंकड्यांत ब्रिटिश विमानें आणि आगबोटी ह्यांच्या भाड्याप्रीत्यर्थ मिळालेल्या रकमेचाहि समावेश आहे.

## सहकारी साखर कारखान्यांकरितां मध्यवर्ती कार्यकारी समिति

### फेडरेशनची पूर्वतयारी

मुंबई राज्यसरकारनें ज्या ठिकाणीं साखर कारखाने निघण्याची शक्यता आहे त्या ठिकाणांची प्राथमिक पहाणी करून नुकतेंच एक निवेदन प्रसिद्ध केलें आहे. त्या निवेदनांत, कोल्हापूर जिल्हा, नीरा व बारामती भाग, तसेंच प्रवरा, गोदावरी व गिरणा नदी-वरील कालव्यांच्या भागांतून सर्वसाधारणपणें १२ सहकारी कारखाने निघूं शकतील असें म्हटलें आहे. या ठिकाणच्या ऊंस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचा स्वतःचा सहकारी कारखाना काढण्यास उत्तेजन देण्याचें धोरणाहि सरकारनें जाहीर केलें आहे. ह्या सरकारी धोरणाचें सर्व ठिकाणीं मोठ्या उत्साहानें स्वागत करण्यांत आलें. वरील सर्व भागांतून सहकारी साखर कारखाने काढण्याकरितां एकूण १६ अर्ज सरकारकडे दाखल झाल्याचें समजतें.

सहकारी साखर कारखाना काढण्यापूर्वी बऱ्याच आनुषंगिक गोष्टींचा विचार व्हावा लागतो. उसाचें क्षेत्र,पाण्याचा प्रश्न, कारखान्याच्या जागेची निश्चितता, जमिनीबाबतचे प्रश्न, वहातुकीचीं साधनें, कारखान्यांस लागणारें भांडवल, वगैरे गोष्टींची तपशीलवार माहिती मिळविणें अत्यंत जरूर असतें. त्याकरितां तांत्रिक विशारदांचा, तसेंच महसूल व पाणीपुरवठादि सरकारी अधिकाऱ्यांचा सल्ला घेणें जरूरीचें असतें. त्या दृष्टीनें ह्या सर्व बाबींचा पूर्णपणें विचार व्हावा म्हणून दि. २८ जुलै, १९५४ रोजीं मुंबई येथें, मुंबई राज्य सहकारी बँकेच्या कचेरींत त्या त्या भागांतील सहकारी कारखान्यांचे मुख्य प्रमोटर्स व इतर सहकारी कार्यकर्त्यांची सभा सर जनार्दन ए. मदन, मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटचे प्रमुख, यांच्या अध्यक्षतेखालीं घेण्यांत आली. सभेस श्री. धनंजयराव गाडगीळ, श्री. वैकुंठराय मेहता, मे. रजिस्ट्रार को. सो., डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, श्री. वा. पुं. वर्दे, मुंबई राज्य सहकारी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. विखे पाटील, उपाध्यक्ष, लोणी सहकारी साखर कारखाना, श्री. शेख, कोल्हापूर जिल्ह्याचे कलेक्टर, श्री. टी. जी. मोहिते, सहकारी शेतकरी संघाचे कार्यकर्ते, वगैरे सहकारी क्षेत्रांतील प्रमुख मंडळी हजर होती. सभेस उपस्थित असलेल्या प्रमोटर्सनीं आपापल्या अडचणी सभेपुढें मांडल्या. सर्व चर्चेचा एकंदर रोख पहातां एक गोष्ट प्रामुख्यानें दिसून आली. ती ही कीं, हें महत्त्वाचें कार्य योग्य तऱ्हेनें पार पाडण्यास प्रत्येक सूचनेचा ( प्रपोजलचा ) पूर्णपणें विचार व चौकशी करण्याची जरूरी आहे. त्याकरतां एक मध्यवर्ती तज्ज्ञांची समिति नेमणें जरूर आहे, व त्याकरतां श्री. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या नेतृत्वाखालीं मध्यवर्ती समिति स्थापन करण्यांत आली. समितींत ठिकठिकाणच्या निघूं पहाणाऱ्या साखरकारखान्यांचे प्रमुख कार्यकर्ते, तसेंच श्री. वैकुंठराय मेहता, उपाध्यक्ष मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, श्री. वा. पुं. वर्दे, मॅनेजिंग डायरेक्टर, मुंबई राज्य सहकारी बँक लि., श्री. विखे पाटील, उपाध्यक्ष लोणी सहकारी साखर कारखाना, रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, वगैरे प्रमुख सहकारी कार्यकर्त्यांचा समावेश करण्यांत आला. तसेंच दोन तांत्रिक विशारदांना समितीवर नेमून घेण्याचा अधिकारही ह्या समितीला दिला आहे.

ह्या समितीचें प्रमुख कार्यालय मुंबई येथें, मुंबई राज्य सहकारी बँक लि., ९ बेक हाउस लेन, मुंबई १, येथें राहील. समितीचें मुख्य काम म्हणजे, ज्या ज्या भागांतून सहकारी साखर कारखाने काढण्याकरतां अर्ज आले असतील त्या त्या भागांत समितीचा चिटणीस प्रत्यक्ष जाऊन सर्व तपशीलवार आनुषंगिक माहिती घेऊन, नंतर त्या त्या भागाबाबतचा अहवाल समितीस सादर करील. समिति, प्रत्येक भागाच्या अहवालाच्या अनुरोधानें त्या भागांत साखर कारखाना काढण्याची कितपत शक्यता आहे, ह्याचा योग्य तो विचार करून आपला निर्णय सरकारकडे कळवील. त्याचप्रमाणें, त्या त्या भागांतील विशिष्ट स्थानिक परिस्थिति विचारांत घेऊन व स्थानिक कार्यकर्त्यांच्या सल्ल्यानें प्राथमिक कामाची कार्यपद्धति ठरविण्यास मदत करील. ह्या मध्यवर्ती समितीमुळें सर्व भागांतील सहकारी साखर कारखान्यांच्या कार्यपद्धतींत एक प्रकारचा सुसंगतपणा व एकसूत्रीपणा येण्यास मदत होईल व पुढील कार्य देखील सोपें होईल. समितीनें सरकारकडे खास ह्या कामास मदत करण्याकरितां सहकारी खात्यांतील एका अधिकाऱ्याची मागणी केली आहे. ह्या अधिकाऱ्याचा उपयोग विशेषतः प्रत्येक कारखाना सहकारी कायद्याखालीं रजिस्टर करण्याकरितां लागणाऱ्या पूर्ण तयारीकरतां होईल. समितीचा चिटणीस म्हणून काम करण्याकरतां सहकारी साखर कारखान्याबाबतींत अनुभव असलेले, मुंबई राज्य सहकारी बँकेचे सिनीअर इन्स्पेक्टर डॉ. श्री-श्रीमल यांची नेमणूक केली आहे. सहकारी साखर कारखाना रजिस्टर झाल्यानंतर ह्या मध्यवर्ती समितीचें रूपांतर कायमपणें "मध्यवर्ती साखर कारखाना मंडळ" (फेडरेशन) म्हणून करण्याचा विचार आहे व अशी संस्था तिला संलग्न असलेल्या सभासद कारखान्याकरितां भांडवल, तांत्रिक बाबी व मनुष्यबळ वगैरे प्रश्न सामुदायिक रीत्या सोडविण्याचा प्रयत्न करील. या बाबतींत कांहीं माहिती पाहिजे असल्यास अगर पत्रव्यवहार करणें झाल्यास वरील पत्त्यावर करावा.

वा. पुं. वर्दे
ऑ. सेक्रेटरी,
सहकारी साखर कारखाना मध्यवर्ती समिति.


## पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

१२५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार–SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर

# आपले खिसे सांभाळा!!

(लेखक: श्री. ग. रा. साठे, साठे बिस्किट अँड चॉकोलेट कंपनी, लि. पुणें)

खिसेकापूंचा कितीहि सुळसुळाट झाला असला तरी त्यांची धाड सरासरीनें हजारांत एखाद्यावरच व तीहि आयुष्यांत केव्हां-तरी एखादे वेळींच येत असेल. त्यांच्या हातसफाईच्या मर्यादाहि अगदीं क्वचित् अपवाद सोडल्यास एक-दोन आकड्यांत मोजण्या-इतक्याच असेल. पण या समाजाचे शत्रू गणल्या गेलेल्या दुर्दैवी प्राण्यांकडून होण्याऱ्या लुबाडणुकीपेक्षा लाखों पटींनीं अधिक गळती आपल्या खिशास लागलेली आहे, ही गोष्ट कोणाचेच लक्षांत येत नाहीं. उलट अशी गळती लावून घेणें हेंच एक प्रतिष्ठेचें लक्षण समजण्यांत येत असल्याचें दिसत आहे. ही अदृश्य गळती म्हणजे दैनंदिन व्यवहारांत परदेशी माल खरेदी करण्यांत आपण जो पैसा खर्च करतो ती. कोट्यावधि रुपये आपल्या खिशांतून या गळतीमुळें जात आहेत हें कित्येकांचे लक्षांतहि येत नाहीं आणि यास आपलें सरकाराहि मदत करीत आहे हें विशेष आश्चर्य!

### देशी कां परदेशी? देशहिताचें कोणतें?

सहकारी धुरीण लोककल्याण योजना आखण्यांत गुंग झाले आहेत. आमच्या खेड्यापाड्यांतील झोंपडींतहि विद्युत्प्रकाश पाडण्याच्या योजना आंखीत आहेत. देशांतील प्रत्येकास काम, अन्न, वस्त्र व आसरा मिळाला पाहिजे असें हिरिरीनें सांगत आहेत. याचा सध्यांच्या सरकारी आयातनिर्यात व औद्योगिक धोरणाशीं मेळ कसा घालावयाचा! एक तर कांहीं व्यक्तींच्या वैयक्तिक स्वार्थास सरकार बळी पडत आहे, अगर आमचे मंत्री गोंधळून गेले असून आपल्या धोरणाचे दूरवर होणाऱ्या परिणामां-कडे न पाहतां चालूं घटका कशी भागवता येईल इतके वरवर पहात असले पाहिजेत. नुकताच एका जबाबदार मंत्र्यांनीं अगर मोघम कशाला—जाहीर भाषणच असल्यामुळें स्पष्ट उल्लेख करण्यासहि हरकत नाहीं—आमच्या उद्योगमंत्र्यांनीं हिशेब मांडून दाखविला कीं, आम्हीं पांच लक्ष रुपयांचीं बिस्किटें आयात केलीं, त्यांत सरकारी तिजोरींत जकात रूपानें ४ लाख रुपये जमा झाले. पण हे चार लाख जमा होतांना अदृश्य परिणाम काय झाला याचा त्यांनीं विचार तरी केला कां नाहीं याची जबरदस्त शंका वाटते. देशांत असलेले बिस्किट कारखाने एकामागून एक बंद पडत असतां (सरकारी आकड्यांप्रमाणेंच एकूण ११२ कारखान्यांवरून चालूं असलेल्या कारखान्यांची संख्या ४३–४४ वर आली आहे) व चालू असलेल्या कारखान्यांनाहि २५–३० टक्के उत्पादन चालू ठेवण्याइतपतहि मालाचा उठाव नसताहि परदेशी बिस्किटें येऊं देण्यांत येत आहेत. आपल्याकडे बिस्किटें हा अगोदरच चैनीचा पदार्थ समजला जातो. मंत्री महाशयांनीं दिलेला आकडा खरा धरला तरी, त्याची बाजारभावानें किंमत १२–१३ लाख रु. होते. एवढा परदेशी माल खपणें म्हणजे साधारणपणें एका कारखान्याच्या उत्पादना इतकी क्रयशक्ति बिस्किट खपांतून बाद झाली. म्हणजे एक कारखाना तरी बंद पडल्या-सारखें होणार. अशा कारखान्यांत सरासरी प्रत्यक्ष कामगार सुमारें १०० असतात. या कारखान्यांस लेबलें, पुठ्याच्या पेट्या, खोकीं, वगैरे पुरवणारे अप्रत्यक्ष कामगार निदान आणखी शंभर. इतक्या लोकांवर बेकारीची पाळी! कारखान्यांत गुंतलेलें भांडवल सुमारें १५ लाख रु. हें बेकार व कदाचित् बाद होणार. या कारखान्याचे नफ्यांतून सरकारला सालोसाल मिळणाऱ्या सुमारें निदान २५–३० हजारांच्या प्राप्तीकरास सरकार मुकणार. ही सर्व नुकसानी लक्षांत घेतल्यास जकातरूपानें मिळणारी रक्कम फायद्याची बाब कीं तोट्याची बाब, याचा विचारच करावा लागेल. बिस्किटांची आयात हें एक छोटेसें उदाहरण झालें. आत्मघातकी धोरण प्रत्येक धंद्याचें बाबतींत अलीकडे सरकारकडून स्वीकारलें जात असल्याचें दिसत आहे. चॉकोलेटच्या धंद्याची तीच तऱ्हा—शाई, पेन्सिलीं, टॉयलेट्स, सारख्या लहान धंद्यांपासून तो साखर, साबण, एंजिनें, यासारख्या मोठ्या धंद्यापर्यंत एकच प्रकार दिसून येत आहे.

### आयातीमुळें किंमती उतरतात?

या धोरणास पोषक म्हणून मांडण्यांत येणारे मुद्देहि न पटण्या-सारखे आहेत. पहिला मुद्दा मांडण्यांत येतो तो आयात केली नाहीं तर किंमती वाढतात, हा मुद्दा अगदीं पोकळ आहे. आज घटकेस कोठल्याहि धंद्याची कोणा एका कारखान्याची मक्तेदारी नाहीं. उत्पादन होणाऱ्या सर्व मालास खप नाहीं, म्हणून आपसांत चढाओढ चालू आहे. अशा स्थितींत किंमती वाढणार कशा? साखरेसारख्या एखाद्या धंद्याचें उत्पादन गरजेपेक्षा कमी असल्याचें दिसतें; पण त्यासहि बऱ्याच अंशीं सरकारी धोरणच कारण असल्याचें बारकाईनें पाहिल्यास दिसेल. तेव्हां किंमत उतरण्याकरितां आयात हा पायाच जाग्यावर नाहीं. कोणताहि देश केवळ आयात करूं शकत नाहीं. आयात अगर निर्यात हा एकेरी रस्ता असूं शकत नाहीं, हा दुसरा मुद्दा. ही गोष्ट अगदीं खरा आहे, पण म्हणून नको असलेली आयात करून पुन्हा देशाला अपायकारक निर्यात करणें म्हणजे कोवळा देऊन आवळा घेण्यासारखें आहे, हें आपल्या आयात निर्यातीच्या मालाची यादी पाहिली म्हणजे दिसून येईल. कापड, चहा अगर गोणपाटासारख्या चारदोन वस्तु सोडल्यास आपण अद्याप कच्चा माल परदेशीं पाठवीत आहोंत व बदली पक्का माल विकत घेत आहों. कापडाचे बाबतींतहि अर्धवट तयार कापड इंग्लंडला पाठवून तेंच ब्लीचिंग व प्रिंटिंग करून पुन्हां आपल्याकडे येत आहे. देशांतील लोकांस स्निग्ध आहार पुरेसा मिळत नसतांनासुद्धां शेंगदाणा, करडी, जवस, यासारखे पदार्थ निर्यात करण्यांत येत आहेत. ७५ वर्षांनीं, देशांत उपलब्ध असलेला कोळसा संपणार आहे, तेव्हां सरपणांत कांटकसर कशी करावी, ही विवंचना सोडण्याकरतां कमिट्या नेमल्या जात असतां व देशांतील कारखान्यांस पुरेसा कोळसा मिळूं शकत नसतां, मुबलक कोळसा आणि तोहि पाकिस्तानसारख्या हितशत्रूंस निर्यात करण्यांत येत आहे. एक ना दोन, कितीतरी उदाहरणें देतां येतील आणि अशी पोटास चिमटा घेऊन निर्यात केल्यावर आमच्या-जवळ आतां परदेशी चलन भरपूर आहे म्हणून तयार मालाची आयात करून देशांत असलेले तुटपुंजे धंदेहि बंद पडण्यासारखी परिस्थिति येऊं द्यावयाची, या धोरणास आत्मघातकी याखेरीज काय म्हणतां येणार!

### चलन फुगवटा टाळण्याकरितां आयात?

तिसरा मुद्दा: चलन फुगवटा कमी करण्याकरितां मुबलक आयात हें एक हत्यार आहे, हा सिद्धांत. जणूं तयार मालाखेरीज आयात करण्यासारखें दुसरें कांहीं नाहींच. पंचवार्षिक योजनेकरतां लागणारी कितीतरी मोठी यंत्रसामुग्री आम्हांला पाहिजे आहे. देशांतील रेल्वेवाहतुकीची अडचण अद्याप दूर झालेली नाहीं. त्याकरितां कितीतरी एंजिनें, मालाचे व उतारूंचे डब्यांची, तसेंच इतर साहित्यांची आम्हांस गरज आहे. समुद्रा-वरील वहातुकीकरतां लागणारीं जहाजें अद्याप आमची नाममात्रच आहेत. हवाई वहातुकहि अद्याप तोटकीच आहे. कापड धंद्यां-

तरी यंत्रसामुग्री जुनी व बाद होण्याच्या वाटेवर असून आधुनिक नवी यंत्रें आणूं द्यावीत कीं नाहीं, याबद्दल खल चालू आहे. अन्नावरील करांची निकडीच्या गरजांची आयातीची जरूरी असतांना चलन फुगवटा कमी करण्याकरितां बिस्किटें, चॉकलेट, पेपरमिंट, टॉयलेट्स सारख्या मालांवर अर्थ मंत्र्यांची नजर कां जावी तें समजत नाहीं. कापडधंद्यांत नवीन यंत्रसामुग्री आणूं द्यावी कां नाहीं यावरच मंत्र्या-मंत्र्यांत खल चालू आहे, म्हणे. त्यामुळें बेकारी वाढेल. मग तयार माल आयात करून देशांतले कारखाने बंद पाडण्यानें दुसरें काय होत आहे? उलट, सर्व कापडगिरण्यांत आधुनिक यंत्रें बसवूनहि येणार नाहीं त्यापेक्षा अधिक बेकारी लहान व मध्यम धंदे बंद पडण्यामुळें निर्माण झाली आहे, हें मध्यंतरी नेमलेल्या एका कमिटीचे अहवालावरून दिसत आहे.

### आयात नियंत्रण हें संरक्षणाचें हत्यार

चौथा मुद्दाः आयात नियंत्रण हें संरक्षणाचें हत्यार नाहीं. युद्धकाळांत हिंदुस्थानांत जे जे कांहीं धंदे निघाले ते बव्हंशीं आयातबंदीचें फळ आहे हें सत्य नजरेपुढें असतांहि आयात-नियंत्रण हें संरक्षणाचें हत्यार नाहीं हें घोकीत रहावें याचें आश्चर्य वाटतें. कोठल्याहि देशांत मूळ धंदे निघण्यास—मग तें अर्थकारणाकरतां असो वा राजकारणाकरितां असो—आयातबंदी वा नियंत्रणच परिणामी हत्यार ठरलें आहे. हें कोठल्याहि देशाच्या औद्योगिक प्रगतीचा इतिहास पाहिल्यास दिसून येणार आहे. कायम आयातबंदी असावी असें कोणीच म्हणणार नाहीं; पण ज्यावेळेस देशांत नवीन नवीन धंदे निघावयाची विशेष निकडीनें गरज आहे, अशा वेळीं तयार मालाची आयात खुली करण्यानें फायदा होणार का नुकसानी!

जे धंदे स्वतःच्या पायावर उभे राहूं शकत नाहींत ते जगण्यास नालायक आहेत. सतत कुबड्यांचा आधार धंद्यांस देणें अशक्य आहे ही ठराविक साच्याचीं उत्तरें म्हणजे जखमेवर मीठ चोळण्यासारखें आहे. बहुतेक धंदे स्वतःचे पायावर उभे राहूं न शकण्याचें कारण सरकारी धोरण असल्याचेंच दिसून येईल. याचा सविस्तर खुलासा करणें मर्यादित जागेंत अशक्य आहे. पण ठळक उदाहरणें द्यावयाचीं झाल्यास कच्च्या मालावराहि १०—४० टक्क्यांपर्यंत असलेली जकात, कांहीं अंतर्गत कच्च्या मालाचे कायद्यानें चढ भाव ठरवून देणें, सेस बसवणें, हीं देतां येतील.

कुबड्यांच्या आधाराबद्दल आम्हांसच हिणवावयास नको. औद्योगिक क्षेत्रांत जगांतला सर्वांत वरती नंबर असलेल्या अमेरिकेंतहि अद्याप कुबड्यांचा आधार लागतो हें पौंडाच्या अवमूल्यनानंतरचा तेथल्या कारखानदारांचा ओरडा व अमेरिकन सरकारनें अधिक उंचावलेल्या जगांत भींति यावरून दिसत आहे. अमेरिकेंतील प्राईस स्टॅबिलायझेशन धोरण सरकारी कुबडी नाहीं तर काय? या कुबडीच्या आधारावर तर आजची अमेरिकन अर्थकारणाची भव्य इमारत उभी आहे.

वरील वाक्बाण हिंदी धंद्यावर फेकले जात आहेत त्याचें एक कारण हें असावें कीं, आमचेकडील अर्थपंडित इंग्लिश अर्थशास्त्राचे चाकोरींतून गेले आहेत. इंग्लंडचें आधुनिक अर्थशास्त्र खुल्या व्यापाराचें आहे. तें इंग्लंडच्या चढत्या काळांत निर्माण होत गेलें आहे व तें अवलंबणें इंग्लंडच्या फायद्याचें आहे. पण अर्थशास्त्राचे सिद्धांत म्हणजे कांहीं रसायन शास्त्राचीं प्रमेयें नाहींत. अमुक भाग हैड्रोजन, अमुक भाग ऑक्सिजन, यांचे संयोगानें पाणी झालेंच पाहिजे. त्यांत स्थळ, काळ, परिस्थितीनें फरक होणार नाहीं. अर्थशास्त्र हें धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, समाजशास्त्र, राजकारण-शास्त्र, यांचेप्रमाणें परिस्थितिसापेक्ष आहे. अर्थशास्त्राचा एकच एक सिद्धांत सदासर्वकाळ सर्वच देशांत सारखा लागू पडणार नाहीं. परिस्थितीनुरूप त्यांत बदल करावाच लागतो. आम्हांला, किंबहुना कोठल्याहि मागासलेल्या देशास, इंग्लंडचे सिद्धांत नुकसानीचेच ठरणार आहेत. आज आम्हांस शून्यांतून विश्व निर्माण करावयाचें आहे. त्याकरतां पहिल्या महायुद्धोत्तर काळांतील जर्मनी, आधुनिक जपान, तुर्कस्थान या देशांचें अर्थशास्त्रच अवलंबावयास पाहिजे. शिवाय, इंग्लंडचीं अर्थप्रमेयें तरी आम्हीं कोठें खऱ्या अर्थानें अवलंबींत आहोंत? इंग्लंड कच्चा माल आयात करते व पक्का माल निर्यात करते, म्हणून तेथले उद्योगधंदे भराभराटींत आहेत. बेकारी नाहीं. भरपूर उत्पन्न आहे. त्याच्या अगदीं उलट आमचा खाक्या! आम्हीं कच्चा मालच बहुंशीं निर्यात करतों. पक्का माल आयात करतों. असलेल्या उद्योगधंद्यांनाहि जगण्याचा अधिकार नाहीं म्हणतो; मग लोकांना काम कोठून मिळणार व माणशीं उत्पन्न वाढणार कसें?

जी गोष्ट आयात—निर्यातबाबत, तीच गोष्ट परकीय कंपन्यांस देशांत कारखाने काढण्याची परवानगी देण्यांत दिसते. शाई, चॉकलेट, कापडाचे रंग, यांसारखे जिन्नस देशांत भरपूर उत्पादन होत असतांना सुद्धां अशा कारखान्यास परवानगी देण्यांत येत आहे. साबण, विजेच्या बॅटरीज, विजेचे दिवे, या धंद्यांत परदेशी कंपन्यांस अस्ताव्यस्त वाढूं देण्यांत येत आहे व त्यामुळें स्थानिक कारखाने एक-एक बंद पडत आहेत. एकेका धंद्याची कशी दैन्यावस्था होत आहे, तें सांगण्यास प्रत्येकीं स्वतंत्र लेखच होतील. कंठशोष करूनहि सध्या सरकारी धोरण बदलण्याचें चिन्ह दिसत नाहीं, तेव्हां उपाय काय? लोकशाहींत सरकारला ताळ्यावर आणण्याचें काम जनतेचें आहे. सरकार जर डोळेझांक करून परकी लोकांना आम्हांस लुटूं देत असेल, तर त्यास जागेपणानें प्रतिकार करणें, परदेशी माल शक्यतों घ्यावयाचा नाहीं असा निश्चय करून आपल्या खिशास व पर्यायानें सबंध देशाचे तिजोरीस लागलेली गळती थांबविणें प्रत्येकाचें कर्तव्य ठरतें. ठिकठिकाणीं लावण्यांत आलेल्या धोक्याच्या सूचनांकडे लक्ष देऊन

आपले खिसे सांभाळा!
गुप्त चोरांपासून सावध रहा!

—"वैभव," ऑगस्ट, १९५४

---

### बँक अवार्डवरील सरकारच्या निर्णयाविषयीं अंदाज

बँक अवार्डसंबंधीं सरकारचा काय निर्णय बाहेर येतो, इकडे बँकांचे चालक व नोकर ह्यांचें लक्ष वेधून राहिलें आहे. सरकारचा निर्णय बँकांना विशेष अनुकूल होणार नाहीं, अशी बातमी आहे. मंत्रिमंडळाची एक उपसमिति ह्या प्रश्नाचा विचार करीत असून, त्या समितीमधील बहुसंख्य सभासद अवार्ड तसाच कायम ठेवण्यास अनुकूल आहेत, अशी वार्ता आहे. २०,००० लोकवस्तीपेक्षा लहान गांवांतील बँकांना मात्र कांहीं सवलती मिळण्याचा संभव आहे. गुप्त रिझर्व्हज् प्रकट करण्याचा प्रश्न सुप्रीम कोर्टापुढें जाईल, अशीं चिन्हें आहेत आणि बोनसचा प्रश्न बँकांनीं सुप्रीम कोर्टाकडे अगोदरच नेलेला आहे.

### चीन व ब्रिटनमधील व्यापार

ब्रिटनमधील मजूरपक्षाचें एक शिष्टमंडळ सध्यां चीनचा दौरा करीत आहे. चीनच्या सरकारचे व्यापारमंत्री आणि मजूरपक्षाच्या शिष्टमंडळांतील कांहींजण ह्यांच्यामध्यें उभय देशांतील व्यापारासंबंधीं बोलणीं झाल्याची वार्ता आहे. वाटाघाटी जवळ जवळ तीन तासपर्यंत चालल्या होत्या. चीनचा परराष्ट्रीय व्यापार सरकारमार्फत एका कॉर्पोरेशनच्याद्वारां चालतो. आयात व निर्यात, दोन्ही प्रकारचा व्यापार ह्याच कॉर्पोरेशनच्या हातीं आहे. कॉर्पोरेशनचे मुख्य अधिकारी मि. शू चँग ह्यांनीं वाटाघाटींविषयीं आशादायक उद्गार काढले आहेत. चालू वाटाघाटी सुरू होण्यापूर्वींहि ब्रिटिश कारखानदार आणि चीनचें सरकार ह्यांच्या दरम्यान व्यापारवृद्धीसाठी बोलणीं चालू होतीं, असें त्यांनीं सांगितलें. चीनला ब्रिटनकडून विजेच्या कारखान्यांची यंत्रसामुग्री पाहिजे आहे. चीनचें औद्योगीकरण झपाट्यानें चाललें असल्यामुळें कारखान्यांना लागणाऱ्या विजेची मागणीहि झपाट्यानें वाढत जाणार हें उघडच आहे. चीनला रशियाकडून मोठी यंत्रसामुग्री मिळत आहेच. तथापि चीनचा परदेशांशीं जो सध्यां व्यापार चालू आहे त्यापैकी ७० टक्के व्यापार रशिआशींच होत आहे. १९४९ मध्यें चीनमध्यें सध्यांच्या कम्युनिस्ट सरकारनें अधिकार-ग्रहण केलें. तेव्हांपासून १९५३ सालअखेर चीनचा परदेशी व्यापार पांच पट वाढला आहे. ह्या वाढत्या व्यापारांत केवळ राजकीय परिस्थितीमुळें ब्रिटनला फारसा वाटा मिळूं शकला नाहीं. ब्रिटनकडून भारी यंत्रसामुग्री घेऊन तिच्या बदला धान्यें, तंबाखू, गोठवलेलीं अंडीं, कच्चें रेशीम, चहा, इत्यादी अनेक प्रकारचा कच्चा माल चीन पुरवूं शकेल. आगामी आर्थिक मंदींत ब्रिटनला चीनची बाजारपेठ लाभली, तर ब्रिटिश कारखाने चालू रहाण्यास मोलाची मदत होईल ह्यांत शंका नाहीं.


# NOTICE

**The Brihan Maharashta Sugar Syndicate Limited.**

*980, Sadashiv Peth, Laxmi Road, Poona-2.*

Notice is hereby given that an Extra Ordinary General Meeting of the Share-holders of the above Company will be held at Tilak Smarak Mandir, Tilak Road, Poona 2, on Wednesday the 15th of September 1954, at 4 P. M. when the following resolution will be proposed as special resolution.

**Resolution**

Resolved that M/S. C. G. Agashe & Co., shall continue to be the Managing Agents of the Company upto 30th June 1959 and that necessary approval of the Central Government be taken for the said extension of the period of the Managing Agency.

By Order of the Board of Directors,

Poona, 18th Aug. 1954. — **C. G. AGASHE & Co.** Managing Agents.

*Note* :—As per the agreement the present Managing Agents M/s. C. G. Agashe & Co. shall be the Managing Agents of the Company until new Managing Agents are appointed by special Resolution of the Company.


### औद्योगिक सहकारी शिक्षण वर्गाचें उद्घाटन

पुणें जिल्हा सहकारी बोर्डाच्या विद्यमानें पुणें येथें औद्योगिक सोसायट्यांच्या कार्यवाहांचा वर्ग उघडण्यांत आला आहे. त्याचें उद्घाटन श्री. रावसाहेब य. द. खोले यांचे अध्यक्षतेखालीं झालें. त्यावेळीं जिल्ह्याचे असिस्टंट रजिस्ट्रार श्री. बी. एस. प्रयाग, श्री. एस. आर. पाळंदे, श्री. ग. र. तुळशीबागवाले, श्री. डॉ. डी. चितळे, वगैरे प्रमुख मंडळी हजर होती. आरंभीं श्री. जे. टी. सावंत, चेअरमन पुणें जिल्हा सहकारी बोर्ड यांनीं अध्यक्षांची ओळख करून दिली. नंतर वरील कार्यकर्त्यांनीं औद्योगिक सहकाराचें महत्त्व पटविणारीं भाषणें केलीं. त्यानंतर अध्यक्षांचें भाषण झालें. शेवटीं श्री. अभ्यंकर, सेक्रेटरी जिल्हा सहकारी बोर्ड पुणें, यांनीं समारोप करून सर्वांचे आभार मानले. सदर वर्गास २५ विद्यार्थ्यांनीं नांवें नोंदविलीं आहेत.

### RESULT OF THE PANCHWATI-SECRETARY TRAINING CLASS

Result of the, Secretary Training Class held w. e. f. 12-5-54 to 15-6-54. in the Panchwati Nagrik Mandal, Panchwati, Nasik, recently received is as detailed below :—

**( In Order of Merit )**

Vasant Nathu Bhamre, Deoram Madhaobhai Tambat, Prabhakar Gangadhar Kulkarni, Manmohan Atmaram Shete, Shantaram Ramchandra Newaskar, Manohar Bansilal Kayastha, Raghunath Pralhad Nandurdikar, R. K. Koshti, Sadashiv Keshao Kathe, Sadashiv Parashram Pandit, Eknath Rangnath Mahamine, Bhaskar Sambhaji Gawali, Ganpat Vithal Gondhali, Prabhakar Madhao Pathak, Dattatray Raghunath Lite.

N. Y. Kulkarni,
Co-operative Training Inspector and
Hon' Secretary, D. C. Board,
NASIK.


फक्त पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सभासदांकरितां

# नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. ची वार्षिक साधारण सभा रविवार दिनांक १२ सप्टेंबर १९५४ रोजीं सायंकाळीं ६-० वाजतां पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे सभागृहांत भरणार आहे.

सदर सभेंत दरसालप्रमाणें वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटापत्रक मंजूर करणें, चेअरमन व व्हाइस चेअरमन निवडणें, ऑडिटर्स यांची नेमणूक करून त्यांचें वेतन ठरविणें, पोट नियम नं. ४० मध्यें बोर्डानें सुचविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करणें वगैरे कामें करण्यांत येतील.

तसेंच सन १९५४-५५ सालाकरितां मे. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या व स्थानिक हिशेब तपासनिसांच्या निवडणुकीसाठी मतदान सदर दिवशीं सकाळीं ८-३० ते १२ वाजेपर्यंत होणार आहे.

तरी सर्व सभासदांनीं सभेस व मतदानास हजर रहावें अशी विनंति आहे.

पुणें शहर, दि. १८-८-५४ — बोर्डाचे हुकुमावरून, मो. वि. खडे मॅनेजिंग डायरेक्टर

## प्रेतें जाळण्याची विजेची भट्टी

मुंबईत चंदनवाडी येथें प्रेतें जाळण्याची विजेची भट्टी सुरू करण्यांत आली आहे. भारतांत अशा प्रकारची सोय प्रथमच करण्यांत येत आहे. गेल्या मे महिन्यापासून भट्टीचा उपयोग करण्यास सुरवात करण्यांत आली. तेव्हांपासून २६६ प्रेतांचें दहन भट्टींत करण्यांत आलें. त्यापैकी २४६ प्रेतें बेवारसी होतीं. २० मृत मात्र नातेवाईक असलेले असे होते. ही भट्टी उभारण्यास ४,५०,००० रुपये खर्च आला आहे. हा मांडवली खर्च झाला. पण भट्टी चालू ठेवण्यास दरमहा ४,००० रुपये खर्च येतो. भट्टींत विजेच्या दोन शेगड्या असून प्रत्येकींत ७१ किलोवॅट विजेच्या दाहकतेचा उपयोग करण्यांत येतो. विजेचा प्रवाह सुरू करण्यांत आल्याबरोबर ६०० अंश सेंटिग्रेड तापमान एकदम उत्पन्न होतें. प्रेताचें संपूर्णपणें दहन होण्यास १ तास अवधि लागतो. सध्यां प्रेतदहनाचें काम सकाळीं ६ ते दुपारीं २ आणि दुपारीं २ ते रात्रीं १० अशा दोन पाळ्यांत करण्यांत येतें. तिसरी एक पाळी सुरू करण्याचा विचार चालू आहे. मोठ्या माणसाचें प्रेत दहन करण्यास १७॥ रुपये आणि १२ वर्षांखालील मुलाचें प्रेत दहन करण्यास ८ रु. १२ आणे खर्च येतो. भारतांत निरनिराळ्या जातींचे लोक प्रेतांची विल्हेवाट निरनिराळ्या पद्धतीनें लावतात. मुंबई कॉर्पोरेशननें प्रेतांच्या विल्हेवाटीसाठी सोयी केल्या आहेत. मुंबईत खाजगी मालकीचीं ५५ स्मशानें आहेत आणि म्युनिसिपालिटीच्या मालकीचीं ९ स्मशानें आहेत. विजेच्या भट्टींत प्रेतें जाळण्याची पद्धत आरोग्याला अधिक पोषक आहे, असें मुंबई कॉर्पोरेशनच्या आरोग्याधिकाऱ्यांचें मत आहे. पण, परंपरागत संस्कारामुळें लोक ह्या पद्धतीचा फायदा घेण्यास तयार होत नाहींत, असें दिसतें.

**मुंबई-टोकिओ विमान मार्ग**—एअर इंडिया इंटर नॅशनल कंपनीनें मुंबई ते टोकिओ ह्या नव्या मार्गावर वैमानिक वहातुक करण्यास प्रारंभ केला आहे. ह्या मार्गावर 'हिमालयन प्रिन्सेस' हें विमान उड्डाण करणार आहे. विमानाची पहिली सफर नुकतीच झाली. त्यावेळीं विमानांत १६ प्रवासी होते.

**भारताचे नवे ऑडिटर जनरल**—भारताचे माजी ऑडिटर जनरल श्री. नरहरी राव आतां सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या जागीं श्री. ए. के. चंदा ह्यांची म्हणून नेमणूक झाली आहे. श्री. चंदा ह्यांचा शपथविधि भारताचे उपाध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् ह्यांनीं नुकताच केला.

**नारळांत साप निघाला?**—कौलालपूर (मलाया) येथील एका मुलीनें नारळ फोडला असतां त्यांत ३ फूट लांबीचा साप निघाला अशी वार्ता आहे. नारळांत साप निघण्याच्या ह्या चमत्कारानें शास्त्रज्ञांची जिज्ञासा जागृत झाली आहे. सामान्य लोक मात्र हा दैवी चमत्कार समजत असून सापाला पवित्र मानीत आहे.

**कॅनडाला "उषा" हत्तिणीची भेट**—कॅनडाला सरकार आणि भारतीय जनता यांच्यातर्फे एका हत्तिणीची भेट देण्यांत आली आहे. ही हत्तीण ५ वर्षे वयाची असून तिचा जन्म आसाममधील तेजपूरच्या हत्तींच्या सरकारी डेपोंत झाला. श्रीकृष्णाचा नातू जो अनिरुद्ध त्याच्या बायकोचें 'उषा' हें नांव तिला ठेवण्यांत येणार आहे. उषा तेजपूरची रहाणारी होती, अशी दंतकथा आहे.

## नासिक डिस्ट्रिक्ट को. ऑप. बोर्ड लि.

(सह्याद्रि विमा कंपनी कांपाऊंड, आग्रा रोड.)


### सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास

नासिक जिल्ह्यांतील सहकारी सोसायट्यांचे नोकरवर्गासाठी व उमेदवारांसाठी सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास नांदगांव येथें ता. २६।८।५४ पासून ता. २५।१०।५४ अखेर मुदतीचा भरवावयाचा आहे. नोकरांनीं आपआपल्या संस्थेमार्फत अर्ज करावेत. ज्या उमेदवारांना सहकारी शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनीं को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर, नासिक यांजकडेस वरील पत्त्यावर ता. २५।८।५४ चे आंत अर्ज करावेत. अर्जासोबत क्लास फी रु. ३ पाठवावी. क्लास फीशिवाय अर्ज स्वीकारिले जाणार नाहींत. उमेदवारांना व संस्थांचे नोकरांना सदर शिक्षण स्वखर्चानें घ्यावें लागेल. भरण्यांत आलेली क्लास फी कोणत्याहि सबबीवर परत केली जाणार नाहीं. उमेदवारांचें शिक्षण निदान व्ह. फा. पास अगर इंग्रजी पांचवी इयत्तेपावेतों असावें. अगर तो सहकारी सोसायटींत काम करीत असला पाहिजे. अर्जांत नांव, शिक्षण, वय, पूर्ण पत्ता आणि सहकारी संस्थेंत काम करीत असल्यास त्या संस्थेचा दाखला जोडून पाठवावा. क्लासचे मुदतींत परीक्षा फी रु. ३ भरावी लागेल; त्याशिवाय परीक्षेस बसतां येणार नाहीं. उमेदवारांनीं ता. २६-८-५४ रोजीं गुरुवारीं दुपारीं ३ वाजतां नांदगांव सुपरवायझिंग युनियनचे ऑफिसांत हजर रहावें, कळावें.

एन्. वाय. कुलकर्णी — ऑन. सेक्रेटरी व को. ट्रे. इ.
दगाजी अजबा पाटील — चेअरमन
डिस्ट्रिक्ट को. ऑप. बोर्ड लि. नासिक.


किर्लोस्कर
'कल्याण' पॉवर शेंगायंत्र

हें यंत्र चालविण्यास ६/८ अश्वशक्तीचें एंजिन लागतें. दरेक तासास ७५ ते ८० पोतीं शेंग फोडली जाते.




या शिवाय कल्याण हात आणि पॉवर शेंगायंत्र आणि कॉटेज शेंगायंत्र हीं लहान यंत्रें मिळतात. मरजेनुरूप आणि पसंतीनुरूप निवड करा.

—सविस्तर माहिती मागवा—

किर्लोस्कर बंधु लि.
किर्लोस्करवाडी, द. सातारा.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.